महाराष्ट्र शासन

क्र. जमीन-२६२४/प्र.क्र.८६/ज-३,

**महसूल व वन विभाग,**
मुख्य इमारत, १ ला मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२४**

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा-
मौजे देवनार, ता. कुर्ला, सर्वे नं.९३, न.भू.क्र.१अ येथील क्षेपणभूमीची (घनकचरा व्यवस्थापनाची) शासकीय जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी मंजूर करण्याबाबत...
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प प्राधिकरण यांची विनंती.

**ज्ञापन :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे पत्र, दिनांक ०४/०४/२०२४, दि. ०८/०५/२०२४ व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र, दिनांक २५/०६/२०२४ व दि. ०५/०९/२०२४ तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे पत्र क्र. सी/ कार्या/ ३डी/ कावि-३१०/ ८९९/ २०२४, दिनांक ०५/०८/२०२४, दि.०८/१०/२०२४ आणि विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे पत्र क्र. मशा/ कार्या-४/जमीन-३/ कावि-२६६०७५६/०८/२०२४/सीआर-२६६, दिनांक ०९/१०/२०२४ ला अनुलक्षून असे कळविण्यात येते की, गृहनिर्माण विभागाने शासन निर्णय, क्र. धापुप्र-२०८/ प्र.क्र.९०/ झोपसु, दिनांक ०५/११/२०१८ अन्वये धारावी पुनर्विकास प्रकल्प "विशेष प्रकल्प" म्हणून घोषित केला असून, सदर प्रकल्पास "महत्वपूर्ण सार्वजनिक प्रकल्प" असा दर्जा दिला आहे. या प्रकल्पांतर्गत धारावीतील पात्र रहिवाशांना मोफत घरे, तसेच सुमारे साडेतीन लाख अपात्र रहिवाशांसाठी परवाडणारी भाडेतत्वावरील घरे विशेष हेतू कंपनीकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून बांधावयाची असल्याने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या दिनांक ०५/०९/२०२४ रोजीच्या पत्रानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे मौजे देवनार ता. कुर्ला, स.नं. ९३, न.भू.क्र. १ अ मधील प्रत्यार्पित केलेली व नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांनी दिनांक ०४/१०/२०२४ रोजी ताब्यात घेतलेली १२४.३ एकर जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी धारावी पुनर्विकास प्रकल्प/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (डीआरए/ एसआरए) व गृहनिर्माण विभागाची विनंती तसेच नगरविकास विभागाची सहमती घेऊन, धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत धारावीतील पात्र / अपात्र रहिवाशांना मोफत / परवडणारी भाडेतत्वावरील घरे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विशेष हेतू कंपनीकडून बांधण्याकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, जमीन-२६२४/ प्र.क्र.४०/ ज-३, दिनांक १५/०३/२०२४ मधील तरतूदीनुसार प्रचलित बाजारमूल्य दराच्या २५% कब्जेहक्काची किंमत वसूल करुन, सदर जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्प / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (डीआरए / एसआरए) यांना खालील अटी / शर्तीवर कब्जेहक्काने प्रदान करण्यात येत आहे.

(कृ.मा.प.)

अटी / शर्ती :-

१) सदर मिळकतीस महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ त्याखालील नियम, जमीन विषयक इतर कायदे व शासनाने वेळोवेळी घेतलेले सर्व धोरणात्मक निर्णय लागू राहतील.

२) सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारातील राहील.

३) वाटपासाठी निर्बाध्यरित्या क्षेत्र निश्चित होण्यासाठी सदर जमिनीची / मिळकतीचे जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी शासकीय खर्चाने मोजणी करुन त्याप्रमाणे क्षेत्र निश्चित करुन तेवढ्या क्षेत्राचे कब्जेहक्काची रक्कम वसूल करुन जमीन मंजूरीचे आदेश पारित करावेत.

४) जमिनीचा ताबा देण्यापूर्वी शासन निर्णय, जमीन-२६२४/प्र.क्र.४०/ज-३, दिनांक १५/०३/२०२४ मधील तरतूदीनुसार जमिनीचे प्रचलित (शासन ज्ञापनाच्या दिनांकाचे) बाजार मूल्य दर तक्त्याप्रमाणे होणाऱ्या किंमतीच्या २५% इतकी रक्कम वसूल करावी.

५) सदर प्रकल्पातील अपात्र झोपडीधारकांची गणना जशी-जशी निश्चित होईल, त्याप्रमाणात धारावी पुनर्विकास प्राधिकरण (DRA) यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे आवश्यक जमिनीच्या ताब्याची मागणी केल्यानंतर जमिनीचा ताबा टप्या-टप्याने द्यावा.

६) सदर जमिनीच्या संदर्भात भविष्यात उद्भवणाऱ्या न्यायालयीन बाबी व निर्णय याच्या अधिन राहून सदरहू आदेश असतील.

७) सदर जमिनीचा अकृषिक वापर अनुज्ञेय होण्याच्या अनुषंगाने संबंधित वाटपग्राही यांनी नियमानुसार आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करुन घ्याव्यात.

८) सदर जमीन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे. त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यात यावा. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय अन्य वापर अनुज्ञेय होणार नाही.

९) सदर जमीन शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय विक्री/ हस्तांतर किंवा भाडेपट्टयाने देता येणार नाही.

१०) शासन निर्णय, क्र. मुद्रांक-२०१७/ अनौ.क्र.११/ प्र.क्र.१३३/ म-१(धोरण), दिनांक २४/१२/२०२० मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याबरोबर जमीन प्रदानानुषंगाने करारनामा करणे बंधनकारक राहील.

११) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना आवश्यक वाटतील अशा अन्य अटी व शर्ती.

०२. सदर ज्ञापन, मा. मंत्रिमंडळाने दिनांक १४/१०/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( अशोक बा. हजारे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा,**
**प्रशासकीय इमारत, १० वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**प्रतिलिपी : -**

१) अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

३) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, १ला मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

४) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, १०वा मजला, चेतना कॉलेज समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (डीआरए/ एसआरए), ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

६) धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रा.लि., हॉलमार्क बिझनेस प्लाझा, गुरुनानक हॉस्पिटल समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

७) नगर भूमापन अधिकारी, कुर्ला (मुलंड), टोपीवाला कॉलेज इमारत, पहिला मजला, सरोजनी नायडू रोड, मुलुंड (प.) मुंबई-४०० ०८०.

८) तहसिलदार, कुर्ला, टोपीवाला कॉलेज इमारत, पहिला मजला, सरोजनी नायडू रोड, मुलुंड (प.) मुंबई-४०० ०८०.

९) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१०) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

११) निवड नस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

*****